cmyk

SHIV VANI

सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

# शिव वाणी

का.संपादक : वेदांत वैभव स्वामी

संपादक : वैभव विवेक स्वामी

● vaibhav11swami@gmail.com
● beedshivvani@gmail.com
● Mo.9422748792/ 9822628521
● SB / BEED / RNP / 279 / 2026 - 2028

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २४ वे | अंक-३८ | सोमवार, दि.२१ सप्टेंबर २०२६ | RNI-MAHMAR2003/14666 | किंमत: ३ रू. | पाने : ४

Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-24 | Issue -38 | Monday, Dt. 21 September-2026 | RNI-MAHMAR2003/14666 | Rupees - 3 Rs | PAGES - 4

# लोकसंवादाची वारी; गणेशभक्तांच्या दारी

## शासनाच्या योजनांची माहिती थेट जनतेपर्यंत पोहोचविणारा अभिनव उपक्रम

**बीड | वेदांत स्वामी**

**एका बाजूला गणरायाचा जयघोष, रोषणाईने उजळलेले गणेश मंडप, दर्शनासाठी आलेले आबालवृद्ध भक्त आणि दुसऱ्या बाजूला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अभिनव कल्पकतेतून नागरिकांच्या दारी पोहोचलेला शासनाच्या योजनांचा माहिती व जनसंपर्क विभागाचा 'लोकसंवाद' चित्ररथ.! भक्ती, श्रद्धा आणि लोकसहभागाच्या मंगलमय वातावरणात लोककल्याणकारी योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याची ही अभिनव संकल्पना गणेशोत्सवाला जनजागृतीची नवी जोड देत आहे.**








माहिती व जनसंपर्क विभागाच्या 'गणेशोत्सवातून लोकसंवाद-२०२६' या विशेष जनजागृती अभियानांतर्गत महाराष्ट्रातील विविध गणेश मंडळांच्या परिसरात शासनाच्या योजना, उपक्रम आणि लोककल्याणकारी निर्णयांची माहिती पोहोचविण्याचा प्रयत्न केला जात आहे. चित्ररथ, माहितीफलक आणि दृकश्राव्य माध्यमांचा उपयोग करून नागरिकांशी थेट संवाद साधण्याची ही संकल्पना सार्वजनिक उत्सवाच्या माध्यमातून शासकीय माहिती लोकांपर्यंत नेण्याचा अभिनव मार्ग ठरत आहे. गणेशोत्सव म्हणजे उत्साह, श्रद्धा आणि सामाजिक एकोप्याचा उत्सव. याच उत्सवातील लोकसहभागाचा उपयोग जनजागृतीसाठी करण्याची कल्पकता या उपक्रमातून दिसून येते. गणरायाच्या दर्शनासाठी आलेल्या नागरिकांना त्यांच्या




दैनंदिन जीवनाशी संबंधित शासकीय योजनांची माहिती मिळावी, हा या अभियानामागील महत्त्वाचा उद्देश आहे. चित्ररथावरील माहितीफलक आणि दृकश्राव्य माध्यमांतून विविध योजनांची माहिती सादर केली जात आहे. त्यामुळे सार्वजनिक गणेशोत्सवाच्या व्यासपीठावरून शासनाच्या योजनांविषयी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. शासकीय

◀◀ पान २ वर

### फोटोसेशन नव्हे, जनतेच्या प्रश्नांना उत्तर देणारा संवाद हवा!

शासकीय योजनांचा प्रचार आणि प्रसार करताना कार्यक्रमांचे छायाचित्रण होणे स्वाभाविक आहे. मात्र, छायाचित्रे प्रसिद्ध होणे म्हणजे अभियान यशस्वी होणे नव्हे. त्याचप्रमाणे छायाचित्रे प्रसिद्ध झाली म्हणून उपक्रम केवळ फोटोसेशनसाठीच राबविला जात आहे, असा निष्कर्ष काढणेही योग्य ठरणार नाही.तर या मागची प्रामाणिक भूमिका याचे कौतुक करणे गरजेचे आहे.

### योजनांच्या माहितीपर्यंत न पोहोचणाऱ्या नागरिकांना निश्चित फायदा

विशेषतः शासकीय कार्यालयांपर्यंत सहज पोहोचू न शकणाऱ्या नागरिकांसाठी हा उपक्रम माहिती मिळविण्याचे एक माध्यम ठरू शकतो. मात्र, मंडप परिसरात चित्ररथ उभा राहणे, माहितीफलक लावणे किंवा दृकश्राव्य माध्यमातून संदेश प्रसारित करणे एवढ्याने जनजागृतीचे उद्दिष्ट पूर्ण होते का, हा विचार करण्यासारखा मुद्दा आहे. योजनांची माहिती पाहणाऱ्या नागरिकांना त्यासाठी अर्ज कुठे करायचा, कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, पात्रता काय आहे, अर्जाची सद्यस्थिती कशी तपासायची आणि अडचण आल्यास कोणाशी संपर्क साधायचा, याची माहिती मिळणेही तितकेच गरजेचे आहे.

# रब्बीच्या १,७७७ लाख टन उत्पादन लक्ष्यापुढे हवामानाचे संकट!

## सप्टेंबरमधील पावसाची तूट २१ टक्क्यांवर; पेरणीपूर्वी जमिनीतील ओलाव्याची चिंता

**नवी दिल्ली | वृत्तसंस्था**

**केंद्र सरकारने आगामी रब्बी हंगामासाठी देशात १ हजार ७७७ लाख टन अन्नधान्य उत्पादनाचे लक्ष्य निश्चित केले असले, तरी पेरणीपूर्वीच हवामानाचे आव्हान निर्माण झाले आहे. १८ सप्टेंबरपर्यंत देशात सप्टेंबर महिन्यातील पावसाची तूट २१ टक्क्यांवर पोहोचली असून, प्रमुख रब्बी उत्पादक राज्यांमध्ये पावसाचे वितरण असमान राहिले आहे. त्यामुळे रब्बी पिकांच्या पेरणीच्या वेळी जमिनीतील ओलावा निर्णायक ठरण्याची शक्यता आहे.**

यंदा गव्हासाठी १ हजार २१० लाख टन, कडधान्यांसाठी १७२ लाख टन आणि भरडधान्यांसाठी २२३ लाख टन उत्पादनाचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. हरभऱ्यासाठी १२३.३ लाख टन, मसुरीसाठी २१ लाख टन, मोहरीसाठी १४३ लाख टन आणि बार्लीसाठी २४.२ लाख टन उत्पादनाचे उद्दिष्ट आहे. रब्बी भातासाठी १६७.२ लाख टन, मक्यासाठी १६६ लाख टन आणि ज्वारीसाठी ३१.९ लाख टन उत्पादनाचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. मागील

◀◀ पान २ वर



# केतन अग्रवाल हत्या प्रकरणाला न्यायालयीन वळण

## पोलिसांकडून २,५०० पानी दोषारोपपत्र दाखल

**पुणे | प्रतिनिधी**

लोहगड किल्ल्यावर व्यावसायिक केतन अग्रवाल यांच्या हत्या प्रकरणात लोणावळा ग्रामीण पोलिसांनी तपास पूर्ण करून तब्बल २,५०० पानी दोषारोपपत्र वडगाव मावळ येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात दाखल केले आहे. भावी पत्नी सिया गोयल हिने साथीदार चेतन चौधरीच्या मदतीने केतनला दरीत ढकलून हत्या केल्याचा संशय तपासातून व्यक्त करण्यात आला आहे.

तपासादरम्यान पोलिसांनी घटनास्थळावरील भौतिक पुरावे, फॉरेन्सिक अहवाल, वैद्यकीय कागदपत्रे तसेच डिजिटल पुरावे संकलित केले. केतन, सिया आणि चेतन यांच्यातील व्हॉट्सप चॅट, फोन कॉल डिटेल्स (उऊ) यांचाही तपास करण्यात आला. याशिवाय प्रत्यक्षदर्शींचे जबाब तसेच

◀◀ पान २ वर

# शेतकऱ्यांचे सौरपंप, सौर प्लेट्स चोरणारी टोळी जेरबंद

## तीन आरोपी अटकेत; सौरपंपासह दीड लाखांची कार जप्त

**गेवराई | प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांच्या शेतातील सौरपंप व सौर प्लेट्स चोरणाऱ्या टोळीचा गेवराई पोलिसांनी पर्दाफाश केला असून, तीन आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून ४० हजार रुपये किमतीचा चोरीचा सौरपंप तसेच गुन्ह्यात वापरलेली सुमारे दीड लाख रुपये किमतीची कार असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**



जव्हारवाडी येथील शेतकरी भगवान विठोबा जवरे यांच्या तक्रारीवरून गेवराई पोलीस ठाण्यात गुरनं. ५५८/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी राजेंद्र हरिभाऊ जवरे, पोपट नवनाथ गुजर (दोघे रा. जव्हारवाडी) आणि नारायण तुकाराम गव्हाणे (रा. चिखली, ता. गेवराई) यांना ताब्यात घेतले. पोलीस कोठडीत चौकशी केली असता आरोपींनी सौरपंप चोरीची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यांच्याकडून ४० हजार रुपयांचा सौरपंप आणि एमएच-४६-एडी-२५४२ क्रमांकाची अंदाजे दीड लाख रुपये किमतीची कार जप्त करण्यात आली. आरोपींची अधिक चौकशी केली असता मादळमोही पोलीस चौकीच्या हद्दीत

◀◀ पान २ वर

# क्रीडा कौशल्यासोबत भविष्यातील करिअरची तयारी करा

## क्रीडा उपसंचालक शेखर पाटील; 'लोकसंवाद' कार्यक्रमात खेळाडूंना मार्गदर्शन

**छ.संभाजीनगर | प्रतिनिधी**

**खेळाडूंनी क्रीडा क्षेत्रात प्रगती साधतानाच शिक्षण, कौशल्यविकास आणि भविष्यातील रोजगाराच्या संधींचाही गांभीर्याने विचार करावा. क्रीडा कारकीर्दीसोबतच पर्यायी करिअरची तयारी केल्यास भविष्यात विविध क्षेत्रांतील संधींचा लाभ घेता येईल, असे प्रतिपादन क्रीडा उपसंचालक शेखर पाटील यांनी केले.**




विभागीय क्रीडा संकुलातील निवासी क्रीडा प्रबोधिनी येथे गणेशोत्सवानिमित्त माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने आयोजित 'लोकसंवाद' कार्यक्रमात ते मार्गदर्शन करत होते. यावेळी माहिती उपसंचालक प्रवीण टाके, जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, क्रीडा प्रबोधिनीच्या प्राचार्य श्रीमती पूनम नवगिरे, सहाय्यक संचालक सुरेश पाटील आदी उपस्थित होते क्रीडा उपसंचालक पाटील म्हणाले, खेळाडूंनी उपलब्ध प्रशिक्षण व सुविधांचा प्रभावी उपयोग करून आपल्या क्रीडा कौशल्याचा सातत्याने विकास करावा. स्पर्धांमधून मिळणारा अनुभव, शिस्त, संघभावना आणि नेतृत्वगुणांचा उपयोग भविष्यातील विविध क्षेत्रांतही करता येतो. क्रीडा क्षेत्रातील अनुभवाच्या आधारे प्रशिक्षक, क्रीडा शिक्षक, शरीरविज्ञान व पुनर्वसन यांसारख्या क्षेत्रांतही करिअरच्या संधी उपलब्ध आहेत. तसेच खेळाडू आरक्षणाच्या माध्यमातून शासकीय सेवेत उपलब्ध संधींची माहिती घेऊन त्यासाठी आवश्यक पात्रता व तयारी करावी, असे आवाहन त्यांनी केले. लोकसंवाद कार्यक्रमांतर्गत

◀◀ पान २ वर

# 'लोकसंवाद' उपक्रमात 'श्रीगणेशा आरोग्याचा'

## ● मध्यवर्ती कारागृहाला वैद्यकीय उपकरणांचे दान; राज्यातील पहिलाच उपक्रम

**छ. संभाजीनगर | प्रतिनिधी**

**बंदीजनांच्या शारिरीक आरोग्यासोबतच त्यांचे मानसिक आरोग्य व कौशल्य विकासासाठी कारागृह प्रशासनाने उपक्रम राबवावे. जेणेकरुन ते कुशल आणि सकारात्मक व्यक्ती म्हणून समाजात परत गेले पाहिजे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सूर्यवंशी यांनी आज केले.**







येथील धर्मादाय सह आयुक्त तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाने मध्यवर्ती कारागृहातील बंदीजनांच्या आरोग्य सेवेसाठी पुढाकार घेत बंदीजनांच्या विविध आरोग्य चाचण्यांसाठी लागणारे वैद्यकीय उपकरणे आज मध्यवर्ती कारागृहाला दान करण्यात आले. यानिमित्त बंदीजनांसाठी आरोग्य तपासणी व निदान शिबिरही आयोजीत करण्यात आले. यावेळी जिल्हा माहिती कार्यालयाचा 'लोकसंवाद' या सहयोगी उपक्रमात 'श्री गणेशा आरोग्याचा' हा उपक्रमही पार पडला. न्या. नितीन सूर्यवंशी यांच्या हस्ते हा कार्यक्रम पार पडला. धर्मादाय सह आयुक्त नितीन जाधव, धर्मादाय उपायुक्त उषा चव्हाण-पाटील, सहा. धर्मादाय आयुक्त प्रभू कापडे, मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक अनिल खामकर, मराठवाडा धर्मादाय वकील संघाचे अध्यक्ष ॲड. चंद्रकांत वरुडीकर, खंडपीठाचे प्रबंधक उमाकांत देशमुख, राजेश सासने, अच्च्युत कराड तसेच सेवाभावी संस्थांचे पदाधिकारी, वैद्यकीय पथक आदी उपस्थित होते. न्या. सूर्यवंशी आपल्या संबोधनात म्हणाले की, बंदीजनांच्या आरोग्यासाठी एखाद्या कारागृहाला इतक्या मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय उपकरणे आणि सहसाहित्य देण्याचा हा राज्यातील पहिलाच उपक्रम असावा.

◀◀ पान २ वर

# राज्यपाल निवासस्थानी गणरायाचे कृत्रिम हौदात विसर्जन

## विसर्जित मूर्तीच्या मातीत कडुलिंबाचे रोप लावणार

**मुंबई | प्रतिनिधी**

**राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या लोकभवन येथील निवासस्थानी विराजमान पाच दिवसांच्या गणरायाचे शुक्रवारी (दि. १८) फुलांनी सजवलेल्या कृत्रिम हौदात विसर्जन करण्यात आले. पर्यावरणपूरक उपक्रम म्हणून समुद्रात विसर्जन न करता कृत्रिम हौदाचा वापर करण्यात आला.**

उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांच्या पुणे दौऱ्यामुळे राज्यपाल वर्मा मुंबईबाहेर असल्याने लोकभवनातील



अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गणरायाची आरती करून बाप्पाला निरोप दिला. शाडू मातीपासून

◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख....

# मराठा आरक्षण : आश्वासनांचा पाऊस नको, न्यायाचा निर्णय हवा.!

मराठा आरक्षणाचा प्रश्न हा केवळ एका समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न नाही, तर सामाजिक न्याय, शैक्षणिक संधी, रोजगार आणि शासनावरील विश्वासाचा प्रश्न आहे. अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या संघर्षात मराठा समाजाने आंदोलने केली, मोर्चे काढले, उपोषणे केली आणि शासनाकडे न्यायाची मागणी केली. प्रत्येक आंदोलनानंतर आश्वासनांची भाषा ऐकायला मिळाली मात्र समाजाच्या मनातील अस्वस्थता अद्याप पूर्णपणे दूर झालेली नाही.महाराष्ट्र सरकारसमोर आज सर्वांत मोठे आव्हान आहे ते म्हणजे भावनांचा आदर राखून, कायद्याच्या चौकटीत टिकणारा आणि प्रत्यक्ष लाभ देणारा निर्णय घेण्याचे.

आरक्षणाचा प्रश्न राजकीय भाषणांचा विषय बनवून चालणार नाही. हा प्रश्न निवडणुकीच्या गणितात अडकवूनही चालणार नाही. समाजाला हवे आहे ते स्पष्ट धोरण, पारदर्शक प्रक्रिया आणि न्याय्य अंमलबजावणी.

यातून एक गोष्ट स्पष्ट होते.आरक्षणाची घोषणा करणे आणि ते न्यायालयीन कसोटीवर टिकवून प्रत्यक्ष लाभ मिळवून देणे, यात मोठा फरक आहे.

सरकारने या फरकाची जाणीव ठेवली पाहिजे. कायदेशीर तयारी अपुरी असेल, तर पुन्हा एकदा आरक्षणाचा प्रश्न न्यायालयीन प्रक्रियेत अडकण्याची आणि समाजाच्या अपेक्षा अपूर्ण राहण्याची शक्यता निर्माण होते.

या प्रक्रियेत दोन गोष्टी स्पष्ट असल्या पाहिजेत.

ऐतिहासिक पुरावे असलेल्या पात्र व्यक्तींना प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अनावश्यक अडथळे येऊ नयेत.

प्रमाणपत्रे देताना पुराव्यांची पडताळणी आणि लागू असलेल्या नियमांचे पालन झाले पाहिजे.

सरसकट प्रमाणपत्रांची मागणी आणि नोंदींच्या आधारे पात्र व्यक्तींना प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया या वेगळ्या बाबी आहेत. शासनाने या दोन्हींचा गोंधळ न करता स्पष्ट, पारदर्शक आणि वेळबद्ध व्यवस्था उभी करावी.

ही घडामोड सरकारसाठी महत्त्वाची कसोटी आहे.

आंदोलन थांबणे म्हणजे प्रश्न सुटणे नव्हे. उपोषण मागे घेतले गेले, याचा अर्थ समाजाच्या सर्व मागण्या पूर्ण झाल्या, असेही नाही. आता सरकारसमोर दिलेल्या आश्वासनांचे प्रत्यक्ष निर्णयांत रूपांतर करण्याची जबाबदारी आहे.

सरकारने कोणती मागणी मान्य केली, कोणत्या मागणीसाठी कोणती प्रक्रिया सुरू आहे, कोणत्या बाबींसाठी अधिक वेळ लागणार आहे आणि त्यामागील कायदेशीर कारणे काय आहेत, हे स्पष्टपणे जनतेसमोर ठेवले पाहिजे.

या पार्श्वभूमीवर सरकारने कोणत्याही समाजाच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ नये, याची काळजी घेतली पाहिजे.

आरक्षणाचा प्रश्न हाताळताना महाराष्ट्र सरकारसमोर मराठा समाजाच्या मागण्या आणि ओबीसी समाजाच्या विद्यमान आरक्षणाबाबतच्या चिंता या दोन्हींचा विचार करण्याची जबाबदारी आहे.

मराठा समाजातील पात्र व्यक्तींना ऐतिहासिक नोंदींच्या आधारे कुणबी प्रमाणपत्रे देण्याच्या प्रक्रियेवर ओबीसी संघटनांनी आक्षेप नोंदवले आहेत. विद्यमान आरक्षणाच्या लाभांवर परिणाम होईल, अशी चिंता काही ओबीसी नेत्यांनी व्यक्त केली आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने कोणत्याही समाजाच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण होऊ नये, याची काळजी घेतली पाहिजे. एका समाजाला न्याय देण्याच्या नावाखाली दुसऱ्या समाजाच्या हक्कांबाबत संभ्रम निर्माण होणे, हे सामाजिक सलोख्यासाठी हिताचे नाही. त्याचवेळी, संभाव्य विरोधाचे कारण पुढे करून पात्र मराठा व्यक्तींना त्यांच्या हक्कांपासून वंचित ठेवणेही योग्य ठरणार नाही. सरकारचे काम समाजासमाजांत संघर्ष निर्माण करणे नाही तर कायद्याच्या चौकटीत न्याय्य मार्ग शोधणे आहे. सरकारने तो शोधावा आणि यावर योग्य तो कायमचा तोडगा काढावा. ज्यामुळे भविष्यात कोणत्याही जाती–जातीमध्ये आरक्षणावरून तेढ निर्माण होणार नाही. कायदा व सुव्यवस्था बिघडणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे. अन्यथा भविष्यात आरक्षणावरून समाजा–समाजामध्ये अराजकता निर्माण होईल. जी कोणत्याही सरकारला तापदायक ठरेल आणि सामान्य जनतेला जगणे असह्य करणारी ठरेल. त्यामुळे यावर सकारात्मक आणि धोरणात्मक विचारातून ठोस पर्याय शोधणे गरजेचे आहे.

# मराठवाडा मुक्ती संग्राम : स्वातंत्र्य, लोकशक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेचा गौरवशाली अध्याय

छ.संभाजीनगर – भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले मात्र तत्कालीन हैदराबाद संस्थानातील जनतेला भारतीय संघात सहभागी होण्यासाठी आणखी तेरा महिने प्रतीक्षा करावी लागली. या संस्थानात आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा, तेलंगणाचा प्रदेश आणि कर्नाटकातील काही भागांचा समावेश होता. त्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ हा दिवस केवळ एका प्रदेशाच्या मुक्तीचा दिवस नसून, भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणून स्मरणात राहिला आहे.



**स्वातंत्र्य मिळाले पण हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले नव्हते**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिश सत्ता संपुष्टात आल्यानंतर संस्थानांच्या भारतात विलिनीकरणाचा प्रश्न निर्माण झाला. तत्कालीन हैदराबादचे निजाम मीर उस्मान अली खान यांनी हैदराबाद स्वतंत्र अस्तित्वात ठेवण्याची भूमिका घेतली. भारत सरकार आणि हैदराबाद संस्थान यांच्यात वाटाघाटी सुरू राहिल्या. काही काळासाठी स्थिती कायम ठेवण्याचा करार अर्थात 'जैसे थे' करार (डींरपवींीळश्रश्र –सीशशाशपीं) करण्यात आला. मात्र संस्थानातील राजकीय परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होत गेली. गावागावांत रजाकारांविरुद्ध संघर्ष वाढत गेला. हैदराबाद संस्थानातील जनतेमध्ये नागरी हक्क, जबाबदार शासन आणि भारतीय संघात सहभागी होण्याची मागणी अधिक तीव्र होत होती. या लोकचळवळीला हैदराबाद स्टेट काँग्रेस, महाराष्ट्र परिषद तसेच विविध सामाजिक व राष्ट्रीय विचारांच्या संघटनांनी दिशा दिली.

**मराठवाड्यात जागृतीची बीजे**

मराठवाड्यातील मुक्ती संग्राम अचानक सुरू झालेला नव्हता. त्यामागे अनेक वर्षांची सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय जागृती होती. राष्ट्रीय विचारांचा प्रसार करण्यासाठी विविध ठिकाणी शाळा, वाचनालये आणि सामाजिक संस्था कार्यरत होत्या. परभणीचे नूतन विद्यालय, औरंगाबादचे सरस्वती भुवन विद्यालय, हिप्परगा येथील शारदा मंदिर, अंबाजोगाईचे योगेश्वरी विद्यालय, उदगीरचे श्यामलाल विद्यालय, लातूरमधील ज्युबिली विद्यालय, बीडचे चंपावती विद्यालय, नांदेडचे प्रतिभा निकेतन आदी संस्थांनी राष्ट्रीय जागृतीच्या कार्याला हातभार लावला. या कार्याला स्वामी रामानंद तीर्थ आणि बाबासाहेब परांजपे यांची प्रेरणा लाभली. १९३८ मध्ये हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या स्थापनेने या चळवळीला संघटित राजकीय स्वरूप मिळाले. निजाम सरकारने या संघटनेवर बंदी घातल्यानंतर सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारण्यात आला. मुक्तिसंग्रामासाठी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, रवी नारायण रेड्डी, देवीसिंह चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंह नाईक, विजयेंद्र काबरा, बाळासाहेब परांजपे यांनी लढ्याचे नेतृत्व केले. काशिनाथ कुलकर्णी, दगडाबाई शेळके, विठ्ठलराव काटकर, हरिश्चंद्र जाधव, जनार्दन होर्टीकर गुरुजी, सूर्यभान पवार, आ. कृ. वाघमारे, विनायकराव चारठाणकर, विश्वनाथराव कातमेश्वरकर अशा अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास अजरामर केला आहे. गावागावातील संघर्षांमध्ये अनेक अनामिक वीरांनी आपले बलिदान दिले आहे. १९३८ च्या सत्याग्रहातील नांदेडच्या कार्यकर्त्यांचा सहभाग या लढ्यात विशेषत्वाने नोंदविला गेला आहे.

**आठ जिल्ह्यांची व्यापक लोकचळवळ**

आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली हे आठ जिल्हे आहेत. तत्कालीन काळातील प्रशासकीय सीमांमध्ये काही बदल झाले असले तरी या संपूर्ण मराठी भाषिक प्रदेशाने हैदराबाद मुक्तीच्या लढ्यात महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला. मराठवाड्याचा संपूर्ण मराठी भाषिक प्रदेश भारतीय संघात विलीन होण्यासाठी आतुर होता. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई हे स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याचे प्रमुख केंद्र होते. हैदराबाद मुक्ती संग्रामात बीड जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी योगदान दिले आणि अनेक स्वातंत्र्यसैनिक हुतात्मा झाले. या व्यापक लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, विजयेंद्र काबरा आणि पी. एच. पटवर्धन यांसारख्या नेत्यांची भूमिका महत्त्वाची ठरली. लढ्याचे स्वरूप केवळ एका शहरापुरते मर्यादित नव्हते. नांदेड, परभणी, सेलू, जालना, अंबड, बीड, उस्मानाबाद, लातूर, अंबाजोगाई, उदगीर, उमरी, धर्माबाद, कंधार, देगलूर आदी भागांत विविध स्वरूपाचे सत्याग्रह, जनजागृती आणि प्रतिकाराच्या चळवळी झाल्या.

**दडपशाहीला लोकशक्तीचा प्रतिकार**

स्वातंत्र्याच्या मागणीला तत्कालीन सत्तेकडून विरोध झाला. आंदोलनकर्त्यांना अटक, कारावास आणि विविध प्रकारच्या दडपशाहीला सामोरे जावे लागले. परिस्थिती अधिक गंभीर झाल्यानंतर रजाकारांच्या हिंसक कारवायांमुळे सामान्य नागरिकांच्या अडचणी वाढल्या. लोकशाही, नागरी हक्क आणि जबाबदार शासनासाठी जनतेने निकराचा संघर्ष केला. प्रशासनाच्या नोंदीनुसार, १९४२ च्या 'भारत छोडो' चळवळीत नांदेड, वैजापूर, गंगापूर, परभणी, सेलू, उस्मानाबाद, बीड, अहमदपूर, जालना आणि अंबड यांसारख्या ठिकाणी सत्याग्रहींना कारावास भोगावा लागला. या आंदोलनामुळे हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्यवादी शक्ती अधिक संघटित झाल्या. स्वातंत्र्याच्या लढ्यातील या सहभागाने मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्याला आणखी गती मिळाली.

**निजामाची आणि भारताची भूमिका**

भारत सरकारने हैदराबाद प्रश्न सोडविण्यासाठी सुरुवातीला संवाद आणि वाटाघाटींचा मार्ग स्वीकारला. मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याने भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी निर्णायक भूमिका घेतली. १३ सप्टेंबर १९४८ रोजी 'ऑपरेशन पोलो' सुरू झाले. भारतीय सैन्याच्या कारवाईसमोर हैदराबाद संस्थानाच्या सैन्याचा प्रतिकार फार काळ टिकला नाही. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने शरणागती स्वीकारली आणि हैदराबाद राज्य भारतीय संघात सहभागी झाले. केंद्र सरकारच्या अधिकृत नोंदीत या प्रक्रियेला भारताच्या राजकीय एकात्मतेतील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून अधोरेखित केले आहे. स्वातंत्र्योत्तर भारताने संस्थानांचे एकत्रीकरण करताना संवाद, राजनैतिक प्रयत्न आणि आवश्यक त्या वेळी निर्णायक कारवाई यांचा समन्वय साधला. हैदराबादच्या प्रश्नावर भारत सरकारने सुरुवातीला संवाद व राजनैतिक प्रयत्नांचा मार्ग स्वीकारला मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यानंतर निर्णायक लष्करी कारवाई करण्यात आली. हैदराबादचा संघर्ष आणि विलीनीकरण हा एकसंघ भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय ठरला. भारताच्या मध्यभागी स्वतंत्र राज्याचे अस्तित्व कायम राहिल्यास निर्माण होणारी राजकीय व प्रशासकीय गुंतागुंत किती गंभीर ठरली असती, याची कल्पना आजही करता येते. भारताच्या राजकीय एकात्मतेच्या दृष्टीने ही कारवाई किती महत्त्वाची होती, हे त्यानंतरच्या घडामोडींवरून स्पष्ट होते. त्यामुळे संस्थानांच्या विलीनीकरणासाठी झालेला हा संघर्ष भारताच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनाक्रम ठरला आहे.

**भाषिक वेगळेपणही लक्षणीय ठरले**

१९४८ मध्ये भारतीय संघात समाविष्ट झालेले हैदराबाद संस्थान आज एकाच राज्याचा भाग नाही. त्यातील मराठवाडा महाराष्ट्रात, तेलुगू भाषिक प्रदेश तेलंगणात आणि कन्नड भाषिक प्रदेश कर्नाटकात समाविष्ट झाला. तत्कालीन हैदराबाद राज्यात आजच्या तेलंगणासह मराठवाडा आणि कर्नाटकातील काही जिल्ह्यांचा समावेश होता. भाषावार प्रांतरचनेनंतर मराठवाडा १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचा भाग झाला. अशा प्रकारे १९४८ मध्ये भारतीय संघाशी जोडलेला हा प्रदेश पुढे आधुनिक महाराष्ट्राच्या प्रशासकीय आणि सामाजिक विकासाचा अविभाज्य घटक बनला.

**१७ सप्टेंबर : मुक्ती संग्राम दिन**

महाराष्ट्र शासनाने ४ मे २००१ रोजी शासन निर्णयाद्वारे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा विभागात 'मुक्ती संग्राम दिवस' म्हणून कायमस्वरूपी साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर १७ सप्टेंबर रोजी मराठवाड्यात शासकीय पातळीवर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांत हा दिवस साजरा केला जातो. विभागीय मुख्यालय असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्याची परंपरा आहे. इतर जिल्ह्यांतही पालकमंत्री किंवा नियुक्त मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते. छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री ध्वजारोहण करतात, कारण हे शहर मराठवाड्याचे विभागीय मुख्यालय असून मुक्ती संग्रामाच्या स्मृतींशी जोडलेले प्रमुख केंद्र आहे. स्मृतिस्तंभाला अभिवादन, हुतात्म्यांना श्रद्धांजली, ध्वजारोहण, मानवंदना आणि विविध शासकीय कार्यक्रमांद्वारे या इतिहासाचे स्मरण केले जाते. महाराष्ट्र शासन मुक्ती संग्रामाचा इतिहास पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी १०० कोटी रुपये खर्चून छत्रपती संभाजीनगर येथे स्मारक उभारत आहे.

**इतिहासाचा सन्मान, भविष्याची प्रेरणा**

मराठवाडा मुक्ती संग्राम हा केवळ भूतकाळातील संघर्ष नाही. तो लोकशाही, स्वातंत्र्य, नागरी हक्क, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकसहभागाच्या मूल्यांची जाणीव करून देणारा इतिहास आहे. या लढ्यात ज्ञात–अज्ञात असंख्य स्वातंत्र्यसैनिक, कार्यकर्ते, महिला, युवक आणि सामान्य नागरिकांनी योगदान दिले. त्यांच्या त्यागामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाड्याच्या भारतीय संघात विलिनीकरणाचा मार्ग मोकळा झाला. १७ सप्टेंबर रोजी तिरंगा अभिमानाने फडकताना त्या काळातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आठवण होते. हा दिवस अन्यायाविरुद्धच्या लोकशाही मूल्यांच्या आणि भारताच्या एकात्मतेच्या विजयाचे स्मरण करून देतो. मराठवाड्याने भारताच्या एकात्मतेसाठी दिलेले योगदान इतिहासाच्या पानांवर अढळ आहे. छत्रपती संभाजीनगरपासून नांदेडपर्यंत, जालन्यापासून लातूरपर्यंत, बीडपासून धाराशिवपर्यंत आणि परभणीपासून हिंगोलीपर्यंत या भूमीने स्वातंत्र्याची आस जपली आणि राष्ट्रीय प्रवाहात सहभागी होण्यासाठी संघर्ष केला. त्या ज्ञात–अज्ञात वीरांना आणि वीरांगनांना कृतज्ञ अभिवादन करणे आणि त्यांच्या त्यागातून लोकशाही व राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, हीच मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची खरी प्रेरणा आहे. १७ सप्टेंबर हा त्यामुळे केवळ स्मरणाचा दिवस नाही; तो मराठवाड्याच्या देशभक्तीला, लोकशक्तीला आणि अखंड भारताच्या एकात्मतेला अभिवादन करण्याचा दिवस आहे.

**प्रवीण टाके,**
उपसंचालक
विभागीय माहिती कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर

# 'लोकसंवाद-२०२६' मधून महात्मा फुले जन आरोग्य योजनेची जनजागृती

## श्रीगणेशा आरोग्याचा उपक्रमांतर्गत आरोग्य शिबिरात नागरिकांची तपासणी आणि मोफत औषधोपचार

**सांगली । प्रतिनिधी**

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने राज्यभरात १६ ते २४ सप्टेंबर २०२६ दरम्यान राबविण्यात येत असलेल्या 'लोकसंवाद–२०२६' या विशेष जनजागृती उपक्रमांतर्गत मिरज शहरातील श्री संत रोहिदास सांगलीवेस गणेशोत्सव मंडळ येथे महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेसह आरोग्य विभागाच्या विविध शासकीय योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली. या योजनांचा पात्र नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन समतानगर प्राथमिक शहरी आरोग्य केंद्र क्र. ७ चे वैद्यकीय अधिकारी डॉ. पृथ्वीराज धनवडे यांनी केले.**

जिल्हा माहिती कार्यालय, सांगलीच्या वतीने तसेच श्री संत रोहिदास सांगलीवेस गणेशोत्सव मंडळाच्या सहकार्याने 'लोकसंवाद' व 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमांतर्गत आयोजित आरोग्य शिबिरात डॉ. धनवडे बोलत होते. यावेळी आरोग्य विभागाच्या प्रियांका खराडे यांच्यासह अन्य कर्मचारी उपस्थित होते. यावेळी डॉ. पृथ्वीराज धनवडे यांनी महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजनेची सविस्तर माहिती देत पात्र लाभार्थ्यांना योजनेच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या आरोग्य सुविधांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. गंभीर आजारांवरील उपचारांसाठी शासनाच्या आरोग्य योजनांची माहिती असणे आवश्यक असून, पात्र नागरिकांनी योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित यंत्रणेशी संपर्क साधावा, असे त्यांनी सांगितले. तसेच 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात येणाऱ्या आरोग्य शिबिरांचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. आरोग्य शिबिरात उपस्थित नागरिकांची आरोग्य तपासणी करून आवश्यकतेनुसार मोफत औषधोपचार करण्यात आले. आरोग्य विभागाच्या विविध योजनांची माहिती देताना जननी सुरक्षा योजना, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, एचपीव्ही लसीकरण, आयुष्मान भारत कार्ड आणि आभा कार्ड याबाबतही नागरिकांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. माता व बालकांचे आरोग्य, किशोरवयीन मुलींसाठी एचपीव्ही लसीकरण तसेच आरोग्य सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. धनवडे यांनी केले. शासकीय आरोग्य योजना आणि आरोग्यविषयक सुविधा थेट नागरिकांपर्यंत पोहोचविणाऱ्या या माहितीपूर्ण उपक्रमास परिसरातील गणेशभक्त, महिला तसेच आरोग्य तपासणीसाठी आलेल्या नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.




## पान १ वरून....

### लोकसंवादाची वारी; गणेशभक्तांच्या दारी

योजनांची माहिती अनेकदा कार्यालये, जाहिराती किंवा विविध प्रसिद्धी माध्यमांतून नागरिकांपर्यंत पोहोचविली जाते. मात्र, नागरिक मोठ्या संख्येने एकत्र येणाऱ्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून ही माहिती त्यांच्या जवळ नेण्याची कल्पना विशेष लक्षवेधी आहे. विशेषतः योजनांची माहिती मिळविण्यासाठी शासकीय कार्यालयांपर्यंत जाणे शक्य न होणाऱ्या नागरिकांसाठी अशा उपक्रमातून माहिती मिळविण्याची संधी निर्माण होऊ शकते. गणेश मंडळांचे सामाजिक नाते, उत्सवातील गर्दी आणि आधुनिक दृकश्राव्य माध्यमांचा वापर यांचा मेळ घालून जनजागृती करण्याचा प्रयत्न कौतुकास्पद आहे. भक्तीच्या वातावरणात लोककल्याणाचा संदेश पोहोचविण्याची ही संकल्पना सार्वजनिक उत्सवाच्या सामाजिक भूमिकेलाही अधोरेखित करते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली शासनाच्या योजनांचा जागर जनतेपर्यंत पोहोचविण्याचा हा उपक्रम असल्याचे अभियानाच्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. 'लोकसंवादाची वारी... गणेशभक्तांच्या दारी' या संकल्पनेतून शासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक सुलभ करण्याचा प्रयत्न केला जात आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात विविध माध्यमांतून योजनांची माहिती पोहोचविण्याचे अभियानाचे उद्दिष्ट आहे. शासनाच्या योजना केवळ कागदोपत्री न राहता त्यांची माहिती सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचणे, हा लोककल्याणकारी प्रशासनाचा महत्त्वाचा भाग आहे. त्या दृष्टीने गणेशोत्सवाच्या लोकप्रिय व्यासपीठाचा उपयोग करण्याची कल्पना उल्लेखनीय आहे. या उपक्रमाचे महत्त्व केवळ योजनांची माहिती प्रसारित करण्यापुरते मर्यादित नाही. नागरिकांना योजनांची पात्रता, अर्जप्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आणि लाभ मिळविण्याचे मार्ग समजल्यास या अभियानाचा उपयोग अधिक व्यापक होऊ शकतो.त्यामुळे जनजागृतीसोबतच नागरिकांच्या प्रश्नांचे निराकरण, योग्य मार्गदर्शन आणि गरजेनुसार संबंधित शासकीय विभागांशी संपर्क साधण्याची सुविधा उपलब्ध झाल्यास या उपक्रमाला आणखी परिणामकारक स्वरूप प्राप्त होईल. अभियानाची जिल्हानिहाय अंमलबजावणी, नागरिकांचा प्रतिसाद आणि प्रत्यक्ष लाभासंबंधीची माहिती उपलब्ध झाल्यास त्याच्या परिणामांचे अधिक वस्तुनिष्ठ मूल्यमापन करता येईल. गणरायाच्या चरणी भक्तीची फुले अर्पण करताना शासनाच्या योजनांची उपयुक्त माहितीही नागरिकांपर्यंत पोहोचावी, ही या उपक्रमामागील भावना आहे. लोकसंवाद, लोकसहभाग आणि लोककल्याण या त्रिसूत्रीच्या माध्यमातून गणेशोत्सवाला जनजागृतीची जोड देण्याचा हा प्रयत्न निश्चितच लक्षवेधी आहे. गणरायाच्या मंगलमय उत्सवातून जनतेपर्यंत पोहोचणारी योजनांची माहिती, नागरिकांच्या प्रश्नांना मिळणारा प्रतिसाद आणि प्रत्यक्ष लाभासाठी होणारे मार्गदर्शन यांचा संगम साधला, तर 'लोकसंवादाची वारी' ही केवळ माहितीची मोहीम न राहता जनतेच्या हिताची प्रभावी चळवळ ठरू शकते. संकल्पनेतून संवाद, संवादातून जागृती आणि जागृतीतून लोककल्याण हाच 'लोकसंवादाची वारी... गणेशभक्तांच्या दारी' या अभिनव उपक्रमाचा अपेक्षित संदेश.!

------------------

### केतन अग्रवाल हत्या प्रकरणाला

सायबर आणि वैद्यकीय तज्ज्ञांचे जबाब आरोपपत्रात समाविष्ट करण्यात आले आहेत. आता न्यायालयाकडून आरोपपत्रातील कागदपत्रांची छाननी केली जाणार असून, त्यानंतर आरोपींविरुद्ध आरोप निश्चित करण्याची प्रक्रिया सुरू होऊ शकते. यामुळे खटल्याच्या सुनावणीचा मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे. दरम्यान, सहआरोपी चेतन चौधरीचे वकील ड. राम सहाणे यांनी न्यायालयात आरोपपत्र दाखल झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला. पोलिसांनी सादर केलेल्या आरोपपत्राचा कायदेशीर अभ्यास करून न्यायालयात आरोपीची बाजू मांडली जाईल, असे त्यांनी सांगितले. लोहगड किल्ल्याच्या दरीत केतन अग्रवाल यांचा मृत्यू झाल्याने मावळसह पुणे जिल्ह्यात खळबळ उडाली होती. आता २,५०० पानी दोषारोपपत्र दाखल झाल्याने या प्रकरणाच्या पुढील न्यायालयीन प्रक्रियेकडे लक्ष लागले आहे.

------------

### रब्बीच्या १,७७७ लाख टन उत्पादन

२०२५–२६ रब्बी हंगामात देशात १ हजार २०६.६ लाख टन गव्हाचे उत्पादन झाले होते. यंदा त्यापेक्षा अधिक उत्पादनाचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. मात्र, गव्हासह हरभरा, मोहरी आणि अन्य रब्बी पिकांसाठी पेरणीपूर्वी जमिनीत पुरेसा ओलावा असणे आवश्यक आहे. पावसाच्या वितरणातील तफावतही चिंतेची आहे. १ ते १८ सप्टेंबरदरम्यान उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशात सरासरीपेक्षा ८ टक्के अधिक पाऊस झाला. मात्र, पंजाबमध्ये ५६ टक्के आणि हरियाणात ४२ टक्के पावसाची तूट नोंदली गेली. राजस्थानमध्येही ८ टक्के तूट असून, महाराष्ट्रातील हरभरा उत्पादक भागांमध्ये सप्टेंबरमधील पाऊस सरासरीपेक्षा तब्बल ५१ टक्के कमी राहिला आहे.

**एल निनोचे सावट कायम**

रब्बी पिकांसाठी सप्टेंबरमधील पाऊस महत्त्वाचा मानला जातो. ऑक्टोबरपासून खरीप पिकांची काढणी सुरू झाल्यानंतर रब्बीची पेरणी वेग घेते. त्यापूर्वी झालेला पाऊस जमिनीतील ओलावा वाढविण्यास मदत करतो. मात्र, यंदा अनेक भागांत पावसाची तूट असल्याने पेरणीच्या वेळी पुरेसा ओलावा उपलब्ध होईल का, हा प्रश्न निर्माण झाला आहे. भारतीय हवामान विभागाने सप्टेंबरमध्ये सरासरीपेक्षा अधिक तापमान आणि कमी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यातच आगामी काळात एल निनोचा प्रभाव अधिक तीव्र होण्याचा अंदाज असल्याने तापमान, पावसाचे वितरण आणि जमिनीतील ओलाव्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे केंद्राचे १ हजार ७७७ लाख टन उत्पादन लक्ष्य गाठताना रब्बी पेरणीच्या काळातील हवामानाची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

----------

### क्रीडा कौशल्यासोबत भविष्यातील

पत्रकारितेतील विविध संधी या विषयावरच्या माहितीचा संदर्भ आपल्या करिअरमध्ये विद्यार्थ्यांनी ठेवावा. तसेच क्रीडा आणि माध्यम क्षेत्रातील शिक्षण आपले व्यक्तिमत्व आणि कौशल्य वाढवू शकते असे त्यांनी स्पष्ट केले. माहिती उपसंचालक प्रवीण टाके यांनी यावेळी माध्यम क्षेत्रातील संधी याविषयी माहिती दिली. क्रीडा क्षेत्रात प्राथमिक करिअर करताना पत्रकारिता व जनमाध्यमातील वेगवेगळ्या संधीबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. 'क्रीडा पत्रकारिता' या विषयावर मार्गदर्शन केले. क्रीडा क्षेत्रासोबत पत्रकारिता, क्रीडा पत्रकारिता, समालोचन, जनसंपर्क, संहिता लेखन, जाहिरात, डिजिटल माध्यम मोबाईल जर्नालिझम अशा कितीतरी क्षेत्रात एक अतिरिक्त कौशल्य म्हणून प्राविण्य मिळवले जाऊ शकते, असे त्यांनी सांगितले. डॉ. दुसाने म्हणाले, खेळाडूंनी क्रीडेसोबत शिक्षणालाही समान महत्त्व द्यावे. क्रीडा कारकीर्दीला विशिष्ट वयोमर्यादा असल्याने पुढील शैक्षणिक टप्प्यांबाबत योग्य वेळी निर्णय घेणे आवश्यक आहे. अकरावी–बारावीनंतर अभियांत्रिकी, वैद्यकीय, संगणक, कृषी, कला यांसह पत्रकारितेतील विविध संधीची, अभ्यासक्रमांची माहिती घेऊन आपल्या आवडी आणि क्षमतेनुसार करिअरची दिशा निश्चित करावी. छत्रपती संभाजी नगर क्रीडा उपसंचालक कार्यालय, माहिती उपसंचालक व जिल्हा माहिती कार्यालय यांच्यामार्फत या महासंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

----------

### शेतकऱ्यांचे सौरपंप, सौर प्लेट्स

आणखी दोन ठिकाणांहून सौर प्लेट्स चोरी केल्याची कबुली त्यांनी दिली. या प्रकरणांमध्ये आणखी मुद्देमाल हस्तगत करण्याची कारवाई सुरू आहे. पुढील तपास पोलीस हवालदार विजय परजणे करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख व गेवराईचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल कटके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, सहायक पोलीस निरीक्षक अतुलकुमार लांडगे, राजाभाऊ गर्जे, पोलीस हवालदार विजय परजणे, प्रल्हाद देवडे, संजय गुजर आणि पोलीस शिपाई शेखर हिंगावार यांच्या पथकाने केली.

----------

### राज्यपाल निवासस्थानी

तयार केलेल्या गणेशमूर्तीचे विसर्जन केल्यानंतर त्या मातीत कडुलिंबाचे रोप लावण्यात येणार आहे. यावेळी राज्यपालांचे सहसचिव एस. रामामूर्ती, परिवार प्रबंधक डॉ. निशिकांत देशपांडे, जनसंपर्क अधिकारी उमेश काशीकर यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

----------

### 'लोकसंवाद' उपक्रमात 'श्रीगणेशा

या सुविधांमुळे कारागृह प्रशासनाला बंदीजनांना वैद्यकीय सुविधा व उपचार उपलब्ध करुन देणे सोईस्कर होईल. बंदीजन हे शिक्षा भोगत असले तरी त्यांचे मानवी हक्क, आरोग्य आणि सन्मानाने जगण्याचा मुलभूत अधिकार अबाधित आहेत. त्याचे रक्षण करणे हे समाजाचे आणि कायदा अंमलबजावणी करणाऱ्या संस्थांचेही कर्तव्य आहे. न्या. सूर्यवंशी पुढे म्हणाले की, कारागृह प्रशासनाने बंदीजनांच्या शारिरीक आरोग्याची काळजी घेतांनाच त्यांचे मानसिक आरोग्य चांगले राखण्यासाठीही उपक्रम राबवावे.त्यांना प्रशिक्षण देऊन त्यांच्यातील कौशल्यांचा विकास करावा. जेणे करुन शिक्षा कालावधी पूर्ण केल्यानंतर ना ते एक कुशल आणि सकारात्मक व्यक्ती म्हणून समाजात परततील. न्या. सूर्यवंशी यांनी बंदीजनांना उद्देशून सांगितले की, एखाद्या चुकीमुळे आपण गुन्हेगार ठरले असलात तरी चुक सुधारण्याचा आपल्याला पूर्ण अधिकार आणि संधी आहे. भूतकाळातील चुका सुधारुन आजच्या प्रयत्नांनी आपले भविष्य घडवावे.प्रास्ताविक कारागृह अधीक्षक अनिल खामकर यांनी केले. धर्मादाय सह आयुक्त नितीन जाधव यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.आरोग्य सुविधा तसेच धर्मादाय म्हणून राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांची सेवा ही तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे आपले कर्तव्य असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. सहभागी संस्था आणि आरोग्य सेवा आजच्या या उपक्रमात महात्मा गांधी मिशन रुग्णालय, सेठ नंदलाल धूत रुग्णालय, डॉक्टर हेडगेवार रुग्णालय, एम.आय.टी. रुग्णालय, एम.एम.आर.आय. कमलनयन बजाज हॉस्पिटल, औरंगाबाद चिकलठाणा लायन्स आय हॉस्पिटल ण्ड रिसर्च इन्स्टिट्युट, बी.एस.पी. मेडीकल कॉलेज ण्ड हॉस्पिटल, इंडीयन मेडीकल असोसिएशन या संस्थांनी या उपक्रमात सहयोग दिला. यावेळी आयोजीत आरोग्य तपासणी शिबिरात हृदयरोग तपासणी, कर्करोग निदान, कान नाक घसा आणि डोळे तपासणी, महिलां करीता कॅन्सर विषयक पॅप स्मीअर तपासणी, मूळव्याध, त्वचारोग तपासणी, डोळ्यांकरीता मोतीबिंदू तपासणी, मोफत चष्मे वाटप, रक्तदाब आणि मधुमेह तपासणी, हाडांची तपासणी,सी.पी.आर. चाचण्या करण्यात आल्या.ग्लोबल फाऊंडेशन, सेंट लॉरेन्स एज्युकेशन ट्रस्ट, मानव विकास कल्याण प्रतिष्ठान, परिपूर्ती मेडीकल फाऊंडेशन,इंडियन इन्स्टिटच्युट फॉर रुरल डेव्हलपमेंट, भाऊराया फाऊंडेशन, फैज ए आम ट्रस्ट अशा विविध धर्मादाय संस्थांनी विविध वैद्यकीय उपकरणे व सहसाहित्याचे दान केले. या सर्व संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानीत करण्यात आले.

-------------

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा

## मराठवाड्यातील दुष्काळमुक्तीसाठी कृष्णाखोरे, कोकणातील पाणी आणणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

**मराठवाड्याचा आधी स्वातंत्र्यासाठी संघर्ष झाला आता दुष्काळाशी संघर्ष सुरु आहे. आताही पावसाने ओढ दिल्याने शेतकरी चिंतेत आहे. या परिस्थितीत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. ही परिस्थिती बदलवण्यासाठी कोकणातील आणि कृष्णाखोऱ्यातील वाहून जाणारे पाणी आपण मराठवाड्यात आणून मराठवाडा दुष्काळमुक्त करु, असा शब्द आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिला.**

मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त आज मुख्यमंत्री फडणवीस छत्रपती संभाजीनगर येथे आयोजीत मुख्य शासकीय सोहळ्यास उपस्थित होते. श्री. फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण, मानवंदना, शहीदस्मारकास अभिवादन करण्यात आले. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन आज मोठ्या उत्साहात साजरा झाला. सिद्धार्थ उद्यान येथे आयोजीत या सोहळ्यास राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, महापौर समीर राजूरकर, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष अविनाश गलांडे, खा.संदिपान भुमरे, खा. डॉ. कल्याण काळे, विधानपरिषद सदस्य आ.सतिष चव्हाण, आ. अंबादास दानवे, आ. सुहास शिरसाट, विधानसभा सदस्य आ. रमेश बोरनारे, आ. प्रदीप जयस्वाल, आ. प्रशांत बंब, आ. विलास भुमरे, आ. अनुराधा चव्हाण, आ. नारायण कुचे, विभागीय आयुक्त जी.श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मनपा आयुक्त अमोल येडगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, माजी खासदार चंद्रकांत खैरे, इम्तियाज जलील तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर, मुक्तिसंग्राम सैनिक, त्यांचे कुटूंबिय, शासकीय अधिकारी- कर्मचारी, पदाधिकारी आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी शहीद स्मारकास मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. उपस्थित सर्व मान्यवरांनीही पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले.त्यानंतर बंदुकीच्या तीन फैरी झाडून मानवंदना देण्यात आली. तसेच राष्ट्रध्वजारोहण करुन राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थितांना संबोधित केले. आपल्या भाषणाच्या प्रारंभी त्यांण छत्रपती शिवराय, राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मानवंदना अर्पित केली. मुक्तिसंग्रामातील योद्ध्यांचे स्मरण ते म्हणाले की, अनेकांच्या बलिदानामुळेच खऱ्या अर्थानं मराठवाडा मुक्त झाला आहे. त्यावेळी लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल, ह्यांनी एक प्रचंड मोठी लढाई उभारली त्यातून आपला मराठवाडा मुक्त झाला. त्यावेळी अत्याचाराची परिसिमा झाली होती.अशा प्रकारच्या अवस्थेतून या मराठवाड्याला बाहेर काढण्याचं काम हे आपल्या स्वातंत्र्य संग्राम सेनानींनी केलं त्यांच्याप्रती आपली कृतज्ञता श्री. फडणवीस यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांना सर्वप्रकारची मदत श्री. फडणवीस म्हणाले की, मराठवाडा सातत्याने संघर्ष करतोय. विकासाचा संघर्ष गेल्या अनेक वर्षांपासून सुरु आहे. दुष्काळाचं संकट हे सातत्याने घोंगावताना दिसतं. यंदाचे वर्ष देखील दुष्काळाचं वर्ष आहे. पावसाचा मोठा खंड पडला आणि मोठ्या प्रमाणात शेतीचं, पिकांचं नुकसान झालं. आमचा शेतकरी चिंतेत आहे. कुठल्याही परिस्थितीमध्ये सरकार पूर्णपणे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभं राहील, शेतकऱ्यांना सगळ्या प्रकारची मदत आपण देऊ. पंचनाम्यांची प्रक्रिया ५ ऑक्टोबर नंतर पूर्ण करुन आम्ही शेतकऱ्यांना मदत करु. पिण्याचे पाणी, चारा अशी सगळी व्यवस्था आणि नियोजन केलं आहे. कर्जमुक्तीचा लाभ, जुनी वीजबिलं रद्द श्री, फडणवीस यांनी पुढे सांगितले की, आपल्या सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना सुरू केली. या योजनेचा सर्वाधिक लाभ मराठवाड्यातील शेतकऱ्यांना दिलाय.आतापर्यंत १५ लाखांच्या वर शेतकरी कर्जमुक्त झाले आहेत. शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला आहेच शिवाय आता जवळपास ४८ हजार कोटी रुपयांची, जुनी वीज बिल रद्द करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे,असेही त्यांनी सांगितले. पुढच्या पिढीला दुष्काळ पाहू न देण्याचा संकल्प मराठवाड्याच्या दुष्काळीस्थितीबाबत ते म्हणाले की, मराठवाड्याच्या या पिढीने दुष्काळ पाहिला; पण पुढच्या पिढीला आपल्याला दुष्काळ पाहू द्यायचा नाही हा संकल्प आम्ही केला आहे. आणि त्या दृष्टीने अतिशय वेगाने वाटचाल सुरु आहे. कृष्णा खोऱ्यातलं पाणी भीमा खोऱ्यातून अतिरिक्त ३० टीएमसी पाणी मराठवाड्यामध्ये आणायचं काम आता सुरू करत आहोत. यामुळे धाराशिव, बीड आणि लातूरच्या भागापर्यंत पाणी आणता येईल.तसेच गोदावरीच्या खोऱ्यामध्ये उल्हास खोऱ्यातून, कोकणातून पाणी उचलून आणि नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून आणण्याचा प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यामध्ये पोहोचले आहे. अंदाज असा आहे की, जवळपास ७० टीएमसी पाणी उल्हास खोऱ्यातून हे गोदावरीच्या खोऱ्यात आपल्याला आणता येईल आणि आपला मराठवाडा कायमचा दुष्काळमुक्त होईल.टप्प्याटप्प्यानं; सात वर्षात हे काम पुर्ण होईल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रत्येक घरी दररोज पाणी शहरातील पाणीपुरवठा योजनेबाबत श्री. फडणवीस म्हणाले की, छत्रपती संभाजीनगरच्या पाणीपुरवठा योजनेचं काम हे आता अंतिम टप्प्यामध्ये पोहोचलेलं आहे. निधीची कमतरता पडू दिली नाही. वेगाने काम चाललेलं आहे. अडचणी आपण दूर करतो आहोत. लवकरच छत्रपती संभाजीनगरमध्ये प्रत्येक घरी रोज पिण्याचं पाणी येईल. त्याकडे आपली वाटचाल ही सुरू झाली आहे,असेही त्यांनी यावेळी सांगितले. देशातील मोठी उद्योग वसाहत श्री, फडणवीस म्हणाले की, छत्रपती संभाजीनगर मध्ये पश्चिम उन्नत द्रुतगती मार्ग आणि समृद्धी महामार्गामुळे शेंद्रा-बिडकीनसारख्या औद्योगिक वसाहती, डीएमआयसीसारखं क्लस्टर आता देशातलं प्रमुख क्लस्टर झालंय. या ठिकाणी टोयोटा, जेएसडब्ल्यू, एथर या सारख्या कंपन्यांमुळे पुढच्या काळात देशामध्ये सर्वाधिक इलेक्ट्रिक व्हेइकल्स मॅन्युफॅक्चरिंग करणारं क्लस्टर हे छत्रपती संभाजीनगरचं क्लस्टर असणार आहे आणि एक वेगळा सन्मान मिळेल,असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. उद्योग क्षेत्राचा विस्तार उद्योग विस्ताराबाबत श्री. फडणवीस म्हणाले की, मोठ्या प्रमाणात गुंतवणूक या ठिकाणी येतेय आणि या गुंतवणुकीला अनुरूप आता आपण इन्फ्रास्ट्रक्चरदेखील तयार करतो आहोत. अजून ८,००० एकर जागा त्या ठिकाणी अधिग्रहित करून आपली औद्योगिक वसाहत आपण मोठी करत आहोत. या संपूर्ण गुंतवणुकीमुळे आपल्याकडे रोजगाराची निर्मिती होतेय आणि या रोजगारातून समृद्धीकडे जाण्याचा प्रयत्न मराठवाड्यात होत आहे,असे त्यांनी सांगितले. सक्षम आणि जलद दळणवळण उद्योगाच्या परिसंस्था विकासासाठी सुरु असलेल्या उपाययोजनांबाबत ते म्हणाले की, जालना ड्रायपोर्टचं काम आता सुरू झालंय. आपल्याकडे तयार होणाऱ्या इलेक्ट्रिक व्हेइकल्सच्या आवश्यक आयात निर्यातीची सुविधा या ड्रायपोर्टवरुन करण्यात आली आहे. तसेच संरक्षण उत्पादनाच्या क्षेत्रातही आपल्याला चांगला वाव आहे. त्यासाठी आपण शेंद्रा-बिडकीन आणि बिडकीन-ढोरेगाव हे दोन रस्ते सहा पदरी करतोय. त्याकरता साडेतीन हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. शहरातला सगळ्यात लांब उन्नत रस्ता आपण तयार करतो त्यामुळे कुठलाही ट्रॅफिक जॅम पुढच्या काळामध्ये होणार नाही,असेही त्यांनी सांगितले. आरोग्य सुविधांचा विकास आरोग्य सुविधांच्या विकासाबाबत श्री. फडणवीस यांनी सांगितले की, छत्रपती संभाजीनगर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे ७१० कोटी रुपयांच्या नवीन इमारतीची उभारणी, धाराशिवमध्ये राज्यातल्या एक ५०० खाटांचे अद्यावत रुग्णालय, मेडिकल कॉलेज असेल, किंवा परळीमध्ये ५६५ कोटी रुपये खर्चून पशुवैद्यकीय महाविद्यालय अशा अनेक सुविधांच्या विकासाचे काम आपण सुरु केले आहे,असे ते म्हणाले. सर्व घटकांच्या जीवनात परिवर्तन श्री. फडणवीस म्हणाले की, मराठवाडा हा आकांक्षी प्रदेश आहे. अनेक अडचणींचा सामना करणारा प्रदेश आहे.सगळ्यांना सोबत घेऊन मराठवाड्याला विकासाच्या वाटेवर आणण्याचे आणि परिवर्तित करण्याचे कार्य आपण सुरू केले आहे. समाजातल्या सर्व घटकांच्या पाठीशी उभं राहून त्यांना शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधा देऊन त्यांच्या जीवनामध्ये परिवर्तनआणण्याचा प्रयत्न सुरु आहे,असे त्यांनी आश्वस्त केले. आपल्या संबोधनानंतर श्री. फडणवीस यांनी मुक्तिसंग्राम सैनिक, त्यांचे कुटुंबिय यांच्या भेटी घेतल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण लोहाडे आणि श्रीमती प्रवीणा कन्नडकर यांनी केले.

## 'बाप्पा डॉट ओआरजी' डिजिटल लोकचळवळीत धुळेकरांनी उत्स्फूर्त सहभागी व्हावे - जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते

### गणेशोत्सवाच्या परंपरा, कला व संस्कृतीचे डिजिटल जतन आणि विविध विभागांनी व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश

**धुळे । प्रतिनिधी**

**धुळे जिल्ह्याच्या गणेशोत्सवाची समृद्ध परंपरा, स्थानिक कला, आरत्या, खाद्यसंस्कृती, मूर्तिकला, लोककला आणि पिढ्यान्पिढ्या जपलेल्या आठवणींचे डिजिटल स्वरूपात जतन करून हा सांस्कृतिक वारसा जगासमोर आणण्यासाठी धुळेकरांनी 'बाप्पा डॉट ओआरजी' या डिजिटल लोकचळवळीत उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी केले.**




'बाप्पा डॉट ओआरजी' उपक्रमाच्या जिल्ह्यातील प्रभावी अंमलबजावणी संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, निवासी उपजिल्हाधिकारी तथा नोडल अधिकारी शरद पवार, उपजिल्हाधिकारी बालाजी क्षीरसागर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुरज जगताप, जिल्हा नियोजन अधिकारी संतोष वानखेडे, धुळे पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र अग्रवाल, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा उपायुक्त डॉ. गिरीष पाटील, कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त चंद्रकांत दुसाने, प्राथमिक शिक्षणाधिकारी वैभव भास्कर यांच्यासह विविध विभाग व यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## अधिकाऱ्यांनी दुष्काळी उपाययोजना गांभीर्याने व संवेदनशीलतेने कराव्यात-जिल्हाधिकारी डॉ.मैनाक घोष

### जत तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीसह विविध विषयांचा घेतला आढावा



**सांगली । प्रतिनिधी**

**दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता अधिकाऱ्यांनी दुष्काळी उपाययोजना गांभीर्याने व संवेदनशीलतेने कराव्यात. उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, चाराटंचाईवर आवश्यक उपाययोजना तसेच संबंधित विभागांनी समन्वयाने काम करून नागरिकांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी दिल्या.**

जत तालुक्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर तसेच विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने तहसील कार्यालय, जत येथे आयोजित आढावा बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जतचे उपविभागीय अधिकारी अजयकुमार नष्टे, तहसीलदार प्रविण धानोरकर, संखच्या अपर तहसिलदार रोहिणी शंकरदास यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. आढावा बैठकीनंतर जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी मौजे उटगी येथील दोडनाला तलावाची पाहणी केली. यावेळी तलावातील पाणीसाठा व सद्यस्थितीची पाहणी करण्यात आली. तसेच उपस्थित ग्रामस्थांशी संवाद साधून सद्यस्थितीबाबत माहिती जाणून घेतली. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व जपून वापर करावा, पाण्याचा अपव्यय टाळावा आणि पाणी बचतीसाठी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी ग्रामस्थांना केले.यावेळी संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी व ग्रामस्थ उपस्थित होते.




## लोकसंवाद अभियानातून गणेशोत्सवात शासकीय योजनांचा जागर

**मुंबई । प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात शासकीय योजनांची माहिती थेट गणेशभक्तांपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या 'लोकसंवाद' अभियानाला मुंबईत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या अभियानाच्या माध्यमातून चिंचपोकळी, लालबाग आणि भायखळा परिसरातील विविध गणेश मंडळांमध्ये नागरिकांशी संवाद साधून शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, रोजगाराच्या संधी आणि सामाजिक जनजागृती उपक्रमांची माहिती देण्यात आली. शुक्रवारी आयोजित या उपक्रमात इतर मागास बहुजन कल्याण विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभाग, तसेच नशामुक्त महाराष्ट्र आणि नशामुक्त मुंबई अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती गणेशभक्तांना देण्यात आली. लोकसंवाद अभियानादरम्यान गणेशभक्तांनी विविध शासकीय योजनांबाबत प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक प्रक्रिया, संपर्क साधण्याची ठिकाणे आणि उपलब्ध सुविधांबाबत मार्गदर्शकांनी नागरिकांना माहिती दिली.

## दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीर

### लोकप्रतिनिधींच्या मागण्यांवर तातडीने उपाययोजना करण्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे निर्देश

**बीड । प्रतिनिधी**

यंदा अल-निनोमुळे बीडसह संपूर्ण मराठवाड्यात पावसाने मोठी ओढ दिली आहे. मी स्वतः एक शेतकरी असल्याने आणि मराठवाड्याची लेक असल्याने मला या भीषण परिस्थितीची व शेतकऱ्यांच्या वेदनांची पूर्ण जाणीव आहे. मात्र, बळीराजाने धीर सोडू नये, शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, या टंचाईवर आपण सर्वजण मिळून एकत्रित मात करू, असा आशादायी विश्वास राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज येथे व्यक्त केला. तसेच, सर्वांना परतीच्या पावसाची अपेक्षा असल्याचेही त्या म्हणाल्या.

खरीप हंगाम आणि संभाव्य टंचाई परिस्थितीबाबत आज बीड येथे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. टंचाईच्या अनुषंगाने राज्य शासन अतिशय गंभीर असून कॅबिनेटच्या प्रत्येक बैठकीमध्ये यावर सविस्तर चर्चा होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मा. मुख्यमंत्री महोदयांनी यापूर्वीच गावपातळीवर नुकसानीचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत, असेही त्यांनी नमूद केले. या बैठकीला खासदार बजरंग सोनवणे (ऑनलाईन), आमदार विक्रम काळे, आमदार प्रकाशदादा सोळंके, आमदार सुरेश धस, आमदार संदीप क्षीरसागर आणि आमदार विजयसिंह पंडित यांच्यासह उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. लोकप्रतिनिधींच्या महत्त्वपूर्ण मागण्या आणि उपमुख्यमंत्र्यांचे निर्देश: नुकसान भरपाई आणि पंचनामे: पावसाचा खंड २९ दिवसांचा नसून ३६ दिवसांचा असल्याचे आमदार सुरेश धस यांनी निदर्शनास आणून दिले. तर, पिकांचे ९० ते ९५% नुकसान झाल्याने एनडीआरएफच्या (छऊठऋ) निकषांपेक्षा



अधिक मदत देण्याची मागणी आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी केली. खासदार बजरंग सोनवणे यांनी नुकसानीची मदत सरसकट मिळावी आणि मागील काळातील प्रलंबित मदतही तत्काळ देण्याची मागणी केली. यावर, प्रशासनाने पिकांच्या नुकसानीचे सर्वेक्षण व पंचनामे अत्यंत वस्तुनिष्ठ आणि पारदर्शकपणे करून सविस्तर अहवाल शासनास सादर करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी दिले. पिण्याचे पाणी आणि टँकर्स: धरणांमधील उर्वरित पाणीसाठा केवळ पिण्यासाठीच राखीव ठेवावा आणि पाण्याचा अवैध उपसा तातडीने बंद करावा, असे कडक निर्देश देण्यात आले. भूजलाचे सातत्याने मोजमाप करावे आणि पिण्याच्या पाण्यासाठी जिथे गरज आहे तिथे टँकरचे प्रस्ताव विनाविलंब मंजूर करून टँकर तातडीने सुरू करावेत. टँकर भरण्यासाठी कृषी क्षेत्रातील खासगी विहिरी अधिग्रहित कराव्यात व नवीन विंधन विहिरी घ्याव्यात, अशा सूचना देण्यात आल्या. बीड शहर पाणीपुरवठा: बीड शहराचा पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तातडीने प्रयत्न करावेत आणि पाणीपुरवठा योजनेची थकीत वीज बिले माफ करण्याबाबत शासन स्तरावर सकारात्मक विचार केला जाईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्र्यांनी दिले. चारा टंचाई आणि चारा डेपो: आष्टी तालुक्यात रेकॉर्डनुसार चारा उपलब्ध नसून परिस्थिती गंभीर असल्याने यावर मदत व पुनर्वसन विभागाकडून चारा डेपो सुरू करण्याचा निर्णय त्वरित घेण्याचे निर्देश देण्यात आले. जलसंधारण आणि धरणे: टंचाईच्या काळात जिल्ह्यात जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घ्यावीत आणि स्वयंसेवी संस्थांच्या (छत्रद्भी) माध्यमातून प्रकल्पातील गाळ काढण्याचे सूक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश प्रशासनाला देण्यात आले. जायकवाडी धरणाचा कालवा पूर्ण क्षमतेने सुरू ठेवण्यासाठी मोहीम हाती घेण्याची मागणी आ. सोळंके यांनी केली. पीक कर्ज आणि बँकिंग: पीक कर्ज देताना 'सिबिल' (उखइखड) रिपोर्टमुळे शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणींची दखल घेत, बँकांनी सिबिलच्या आधारावर कर्ज नाकारू नये, अशी ताकीद देण्यात आली. बैठकीच्या शेवटी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी उद्याच्या 'मराठवाडा मुक्ती संग्राम दिना'च्या (१७ सप्टेंबर) पार्श्वभूमीवर सर्व उपस्थित लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि नागरिकांना शुभेच्छा दिल्या. प्रशासनाने सर्व लोकप्रतिनिधींच्या सूचनांची गंभीर दखल घेऊन टंचाई निवारणासाठी युद्धपातळीवर कामाला लागावे, असे आदेश त्यांनी दिले.

# बीडचा सर्वांगीण विकास साधणार-उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनेत्रा पवार

## मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन उत्साहात साजरा, विविध विकासकामांची घोषणा

**बीड । प्रतिनिधी**

**मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या निमित्ताने आज बीड येथे राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण मोठ्या उत्साहात पार पडले. मराठवाड्याच्या लढ्यात बीड आणि अंबेजोगाईचा मोठा वाटा राहिला असून, या ऐतिहासिक भूमीचा चेहरामोहरा बदलून 'सुदृढ, सुशिक्षित, समृद्ध आणि सुरक्षित बीड' घडवण्याचा संकल्प पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी यावेळी व्यक्त केला.**

या शासकीय कार्यक्रमापूर्वी उपमुख्यमंत्री पवार यांनी हुतात्मा स्मारकाला भेट देऊन हुतात्म्यांना पुष्पचक्र अर्पण करत आदरांजली वाहिली. तसेच उपस्थित स्वातंत्र्यसैनिक, त्यांचे कुटुंबीय आणि शहीद सैनिकांच्या कुटुंबीयांची आपुलकीने भेट घेतली. यावेळी व्यासपीठावर आ. विजयसिंह पंडित, नगराध्यक्षा प्रेमलता पारवे यांच्यासह उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर जनतेला संबोधित करताना पालकमंत्री पवार यांनी राज्यातील १३ कोटी जनतेच्या वतीने मुक्तीसंग्रामातील हुतात्मा वीरांना व स्वातंत्र्यसैनिकांना अभिवादन केले. हा लढा केवळ मराठवाड्यापुरता मर्यादित नव्हता, तर त्यात तेलंगणा व कर्नाटक मुक्तीसाठी योगदान देणाऱ्या वीरांचाही सहभाग होता, असे सांगत त्यांनी त्यांनाही वंदन केले. आजच्या या मंगलदिनी गणेशोत्सव आणि महालक्ष्मी सणाचे पर्व सुरू असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस असल्याने बीडकरांच्या वतीने त्यांनी पंतप्रधानांना शुभेच्छा दिल्या. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तब्बल १३ महिने २ दिवसांनी, म्हणजेच १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या जुलमी राजवटीतून मुक्त झाला. या स्वातंत्र्यासाठी जनतेला सशस्त्र लढा द्यावा लागला व रक्त सांडावे लागले. आपले वडील कै. बाजीराव पाटील हे स्वतः या संग्रामात मुक्तिसैनिक म्हणून सहभागी झाले होते, हा आपल्यासाठी अत्यंत अभिमानाचा वारसा असल्याचे सांगताना त्या भावुक झाल्या. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखालील या लढ्याचा बीड व अंबेजोगाई हा केंद्रबिंदू होता. हा लढा केवळ राजकीय स्वातंत्र्यासाठी नसून शिक्षण, स्वाभिमान व लोकशाही मूल्यांसाठी होता, असे त्या म्हणाल्या. यावेळी त्यांनी विठ्ठलराव काटकर यांचा गनिमी कावा, डॉ. ताराबाई परांजपे, कॉम्रेड करुणा चौधरी, प्रमिला कुलकर्णी, प्रतिभाताई वैशंपायन



यांचे योगदान, रझाकारांविरुद्ध शहीद झालेल्या गोदावरीबाई टेके आणि पुरुषवेशात लढणाऱ्या दगडाबाई शेळके यांच्या अतुलनीय शौर्याचा गौरवपूर्ण उल्लेख केला. धारूरचे हुतात्मा काशिनाथ बच्चाळकर, बीडचे हुतात्मा वसंत राक्षसभुवनकर यांच्यासह जिल्ह्यातील २२ हुतात्म्यांच्या बलिदानाचे व पुरुषोत्तमराव चपळगावकर, रामभाऊ स्वामी आणि काशिनाथराव जाधव यांच्या नेतृत्वाचेही त्यांनी स्मरण केले. हा इतिहास केवळ स्मरण करण्यापुरता नसून पुढील पिढीला प्रेरणा देणारा असल्याचे त्या म्हणाल्या. बीड जिल्ह्याच्या विकासाला गती देणाऱ्या अनेक प्रकल्पांची माहिती पालकमंत्र्यांनी दिली: रेल्वे सेवा: गतवर्षी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीड-अहिल्यानगर रेल्वेचे उद्घाटन करताना बीडकरांना पुण्याला रेल्वेने जाण्याचे वचन दिले होते. ते वचन पूर्ण करत आज पुण्याला जाणाऱ्या रेल्वेला हिरवा झेंडा दाखवला जाणार असल्याची घोषणा त्यांनी केली. सांस्कृतिक विकास: यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नूतनीकरणाचे आणि मुलांना विज्ञानाची ओळख करून देणाऱ्या अत्याधुनिक तारांगणाचे आज भूमिपूजन होणार असल्याचे त्यांनी सांगितले. तीर्थक्षेत्र व शिक्षण: परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी ३०१ कोटी रुपयांच्या सुधारित आराखड्याला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. तसेच, परळीत ५६५ कोटी रुपये खर्चून ४१ हेक्टरवर उभारलेल्या पशुवैद्यकीय महाविद्यालयाचे गेल्याच महिन्यात उद्घाटन झाले आहे. क्रीडा क्षेत्र: क्रीडा संकुलाच्या विकासासाठी २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, ऑलिम्पिक पदकविजेते स्वर्गीय खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा यंदा बीडमध्ये होणार असल्याची मोठी घोषणा त्यांनी केली. बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी राबवण्यात येत असलेल्या योजनांचा सविस्तर आढावा सुनेत्रा पवार यांनी घेतला: शेती व सिंचन: अल-निनोमुळे पावसाची स्थिती समाधानकारक नसली तरी प्रशासनाला आवश्यक पाहणीच्या सूचना दिल्या असून शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत सुमारे ६७ हजार शेतकऱ्यांच्या खात्यात ४९१ कोटी रुपये जमा करून सातबारा कोरा करण्यात आला आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात ४०० गावांची निवड झाली आहे. तर आष्टी उपसा सिंचन योजनेमुळे १.६८ टीएमसी पाणी उपलब्ध होऊन २६ गावांतील ८,१४७ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. रोजगार व निधी: २०२५-२६ या वर्षात जिल्ह्यात जवळपास १४,७६५ कामांतून सुमारे दीड कोटी मनुष्यदिवस रोजगार निर्माण झाला असून, यंदा ६२३ कोटी रुपयांचा जिल्हा नियोजन निधी उपलब्ध झाला आहे. 'महाराजस्व समाधान शिबिरां'मधून १ लाख ४० हजारांहून अधिक नागरिकांना थेट लाभ मिळाला आहे. आरोग्य व सामाजिक न्याय: आरोग्य क्षेत्रात मोतीबिंदू शस्त्रक्रियांमध्ये १६० टक्के उद्दिष्टपूर्ती झाली आहे. 'मिशन साथी' अंतर्गत ऊसतोड कामगारांना आरोग्य सुविधा व आयुष्मान कार्ड दिली जात आहेत. त्यांच्या मुलांसाठी राज्यातील पहिले 'संत भगवानबाबा मुलांचे शासकीय वसतिगृह' गेल्या महिन्यात सुरू करण्यात आले. लाडकी लेक व कुणबी प्रमाणपत्र: 'लेक लाडकी' योजनेतून साडेसात हजारांहून अधिक लाभार्थींना आर्थिक मदत मिळाली आहे. जिल्ह्यात आतापर्यंत २ लाख ११ हजारांपेक्षा अधिक कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप झाले असून हैदराबाद गॅझेटवर आधारित ५५४ अर्जांवर १०० टक्के कारवाई पूर्ण झाली आहे. बीड जिल्हा विकासाच्या नव्या वाटेवर असून 'सुदृढ, सुशिक्षित, समृद्ध आणि सुरक्षित बीड' घडवण्यासाठी सर्व बीडकरांनी खंबीर साथ द्यावी, असे आवाहन करत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सर्वांना मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

SHIV VANI
शिव वाणी
क्रीडा, न्यायनिवाडा, क्राईम घडामोडी...
पेज क्रमांक 4
सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६
Monday, Dt. 21 September-2026

# बीड-पुणे रेल्वेला उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते हिरवा झेंडा

## रेल संख्या झिरो वन फोर झिरो वन प्रस्थान के लिए तयार है हा ऐतिहासिक आवाज परिसरात घुमला..!

**बीड । प्रतिनिधी**

**मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधत बीडकरांसाठी आजचा दिवस अत्यंत ऐतिहासिक व आनंददायी ठरला. अनेक दशकांपासून प्रतीक्षेत असलेल्या 'बीड-पुणे' थेट रेल्वेसेवेचा राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून शानदार शुभारंभ करण्यात आला. याच भरगच्च कार्यक्रमात बीडच्या सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकासाला मोठी चालना देणाऱ्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नूतनीकरणाचे आणि धानोरा रस्त्यावरील 'पंढरी' येथील विज्ञान उद्यान व तारांगण प्रकल्पाचे भूमिपूजनही मोठ्या उत्साहात पार पडले.**





या महत्त्वपूर्ण सोहळ्यासाठी खासदार बजरंग सोनवणे, आमदार प्रकाश सोळंके, आमदार विजयसिंह पंडित या लोकप्रतिनिधींची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रशासकीय पातळीवर उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान आणि जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत हे प्रामुख्याने उपस्थित होते. बीड जिल्हा अनेक दशके रेल्वे नकाशापासून दूर असल्याने शेतकरी, विद्यार्थी, व्यापारी आणि नोकरदार वर्गाला मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र, केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्यातून आज सुरू झालेल्या या थेट रेल्वे सेवेमुळे बीडकरांची अनेक वर्षांची प्रतीक्षा अखेर संपुष्टात आली आहे. याप्रसंगी बोलताना उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी दिवंगत नेते अजित पवार यांच्या स्वप्नांना उजाळा दिला. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून काम करताना त्यांनी रेल्वे जोडणीला नेहमीच प्राधान्य दिले होते. गेल्या वर्षी १७ सप्टेंबर २०२५ रोजी बीड-अहिल्यानगर रेल्वेसेवा सुरू करताना, पुढील वर्षी बीडकरांना थेट पुण्यापर्यंत प्रवास करता येईल, असा शब्द देण्यात आला होता. आज तोच शब्द पूर्ण करताना मराठवाड्याची कन्या म्हणून मला विशेष अभिमान वाटत आहे, अशी भावनिक प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली. तसेच, येत्या काही महिन्यांत बीड ते पनवेल ही थेट रेल्वेसेवा सुरू करण्याचा मानस व्यक्त करत बीड-परळी मार्ग पूर्ण झाल्यानंतर हा मार्ग थेट दक्षिण भारताशी जोडला जाईल आणि त्यामुळे मराठवाड्याच्या विकासाला मोठी गती मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. रेल्वेच्या शुभारंभासोबतच बीड शहराच्या वैभवात भर घालणाऱ्या दोन महत्त्वाच्या प्रकल्पांची मुहूर्तमेढ देखील रोवली गेली. बीडच्या स्थानिक कलाकारांसाठी अनेक दशकांपासून हक्काचे व्यासपीठ असलेल्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाच्या नूतनीकरणासाठी ८ कोटी १९ लाख रुपयांचा निधी प्रशासकीय पातळीवर मंजूर करण्यात आला असून, जुन्या भिंती कायम ठेवत येथे अत्याधुनिक ध्वनी व प्रकाश व्यवस्था, साउंड इकोस्टिक, सेंट्रल एसी, आरामदायी आसनव्यवस्था आणि आधुनिक ग्रीन रूम्स उभारण्यात येणार आहेत. यासोबतच, धानोरा रस्त्यावरील पंढरी येथे सुमारे २८ कोटी रुपये खर्चाचे भव्य तारांगण व विज्ञान उद्यान उभारले जाणार आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी जिल्हा नियोजन समितीमार्फत १४ कोटी रुपयांना मंजुरी मिळाली असून, या ठिकाणी विद्यार्थ्यांना मातृभाषेतून कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), आभासी तंत्रज्ञान आणि खगोलशास्त्राची सविस्तर माहिती उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमाच्या समारोपात पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी १७ सप्टेंबर या मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त हैदराबाद मुक्ती संग्रामात हौतात्म्य पत्करलेल्या व तुरुंगवास भोगलेल्या सर्व ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांना विनम्र आदरांजली वाहिली. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा वाढदिवस असल्याने त्यांनाही मंचावरून हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि येथील जनतेचे जीवनमान उंचावण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही देत, मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देऊन या दिमाखदार सोहळ्याची सांगता झाली. यावेळी रेल संख्या झिरो वन फोर झिरो वन प्रस्थान के लिए तयार है हा आवाज परिसरात घुमला. शिट्टीचा तीव्र स्वर घुमला, इंजिनाने दमदार गर्जना केली आणि पाहता पाहता, झिरो वन फोर झिरो वनने आपल्या पुढच्या प्रवासासाठी वेग घेतला. यावेळी भारतीय रेल्वेचा महाराष्ट्र राज्याच्या विकासात योगदान या विषयावर निबंध आणि चित्रकला स्पर्धेमधील उत्तीर्ण शाळकरी विद्यार्थ्यांना उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले तर विभागीय रेल्वे प्रबंधक राजेशकुमार वर्मा, तसेच खासदार बजरंग सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले.

# 'अमृत-२' अंतर्गत सर्व कामे मार्च अखेर पूर्ण करा-मुख्यमंत्री फडणवीस

## पोहरा नदी पुनरुज्जीवनासह विविध कामांचा आढावा



**नागपूर । प्रतिनिधी**

**नागपूर शहरात 'अमृत २' अंतर्गत सुरू असलेली सर्व कामे मार्च २०२७ पर्यंत गतीने आणि गुणवत्तापूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.**

शहरात 'अमृत २' योजनेअंतर्गत सुरू असलेली विकासकामे आणि पोहरा नदीचे प्रदूषण निर्मूलन व पुनरुज्जीवन या महत्त्वाच्या विषयांवर रामगिरी शासकीय निवास येथे आढावा बैठकीत मुख्यमंत्री श्री. फडणवीस ते बोलत होते. आमदार प्रवीण दटके, स्थायी समिती सभापती शिवाणी दाणी, महापालिका आयुक्त डॉ. विपीन इटनकर, अतिरिक्त आयुक्त अंकित, मुख्यमंत्री यांच्या ओएसडी श्रीमती आशा पठाण, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता संभाजी माने, कार्यकारी अभियंता नीता ठाकरे, महापालिकेच्या मुख्य अभियंता लीना उपाध्ये, नगरसेवक तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकी दरम्यान 'अमृत २' योजनेअंतर्गत शहरात सुरू असलेल्या रस्ते खोदकाम व त्यानंतरच्या पुनर्भरण (ीशर्ळींरींळेप) कामांचा आढावा घेण्यात आला. बैठकीत उपस्थित नगरसेवकांनी त्यांच्या प्रभागातील खोदकाम व पुनर्भरणच्या कामाबद्दल समस्या मांडल्या. तसेच नगरसेवकांनी रिंग रोड वरील सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे सुरू असलेल्या कामाबद्दलही काही मुद्दे मांडण्यात आले. आमदार श्री. दटके यांनी नागरिकांना होणाऱ्या त्रासाबद्दल नाराजी व्यक्त केली. तसेच स्थायी समिती सभापती श्रीमती शिवानी दाणी वखरे यांनी पावसाळ्यात नागरिकांना झालेल्या त्रासाबद्दलची माहिती दिली.

# महावितरणच्या कार्यकारी संचालकपदी अंकुर कावळे, संदीप पाटील, चंद्रमणी मिश्रा, सुनील काकडे रूजू

**मुंबई । प्रतिनिधी**

**महावितरणच्या प्रादेशिक संचालक / कार्यकारी संचालकपदी प्रतिनियुक्तीच्या भरती प्रक्रियेतून निवड झाल्यानंतर श्री. अंकुर कावळे, श्री. संदीप पाटील, श्री. चंद्रमणी मिश्रा व श्री. सुनील काकडे यांनी नुकताच कार्यभार स्वीकारला. नवनियुक्त कार्यकारी संचालक याआधी महावितरणमध्ये मुख्य अभियंता म्हणून विविध ठिकाणी कार्यरत होते.**



कार्यकारी संचालक श्री. अंकुर कावळे याआधी मुख्यालयात मुख्य अभियंता (वितरण) म्हणून कार्यरत होते. त्यांनी विद्युत अभियांत्रिकीमध्ये पदव्युत्तर पदवी आणि व्यवस्थापन क्षेत्रातील पदव्युत्तर पदविका संपादन केली आहे. सन १९९७ मध्ये सहायक अभियंता म्हणून श्री. कावळे तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये रूजू झाले. पदोन्नतींनंतर त्यांनी नाशिक, अहिल्यानगर, पुणे, कोल्हापूर येथे विविध पदांवर काम केले आहे. सन २०२५ पासून ते मुख्य अभियंता म्हणून मुंबई मुख्यालयात कार्यरत होते. कार्यकारी संचालक श्री. संदीप पाटील यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी संपादन केली असून सन २००३ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ते सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. सन २००९ मध्ये त्यांची थेट भरतीमध्ये कार्यकारी अभियंतापदी निवड झाली. सन २०१८ मध्ये अधीक्षक अभियंतापदी तर सन २०२५ मध्ये त्यांची मुख्य अभियंता म्हणून पदोन्नती झाली. श्री. संदीप पाटील हे मुख्य अभियंता (वीज खरेदी) म्हणून मुख्यालयात कार्यरत होते. कार्यकारी संचालक श्री. चंद्रमणी मिश्रा यांनी विद्युत अभियांत्रिकीची पदवी विशेष प्रावीण्यासह संपादन केली आहे. सन २००३ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ते सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. त्यानंतर पदोन्नतींवर त्यांनी अलिबाग, वाशी, छत्रपती संभाजीनगर, मुंबई येथे काम केले आहे. सन २००९ मध्ये त्यांची थेट भरतीमध्ये कार्यकारी अभियंता म्हणून निवड झाली. तर सन २०१८ मध्ये अधीक्षक अभियंता म्हणून तर सन २०२४ मुख्य अभियंतापदी पदोन्नतीने झाली. श्री. मिश्रा कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते. कार्यकारी संचालक श्री. सुनील काकडे यांनी विद्युत अभियांत्रिकीची पदवी संपादन केली असून १९९७ मध्ये तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामध्ये ते सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. त्यानंतर विविध पदांवर त्यांनी चाळीसगाव, नाशिक, भुसावळ, छत्रपती संभाजीनगर, कल्याण, अहिल्यानगर, भांडूप येथे काम केले. श्री. काकडे यांची सन २०२२ मध्ये मुख्य अभियंतापदी पदोन्नती झाली. भांडूप परिमंडलानंतर सन २०२५ पासून श्री. सुनील काकडे पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

# रुकडीतील गणेशोत्सव मंडळाच्या प्रांगणात 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमाचे आयोजन

**कोल्हापूर । प्रतिनिधी**

**गणेशोत्सवाच्या उत्सवी वातावरणात शासनाच्या योजना आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने रुकडी येथील साई युवक मंच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या प्रांगणात 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.**

याप्रसंगी उपस्थित युवक युवतींना क्रीडा संचालनाकडून क्रीडापटूंसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध क्रीडा योजनांची माहिती क्रीडा व युवक सेवा कोल्हापूर विभागाचे उपसंचालक सुहास पाटील यांनी दिली. यावेळी बोलताना श्री. पाटील म्हणाले, युवकांनी व्यायामाची आवड जोपासावी तसेच क्रीडापटूंनी डोपिंगपासून दूर रहावे. शाहू महाराजांनी तत्कालीन कालखंडात कोल्हापूरमध्ये क्रीडा संस्कृती रुजविली. या जिल्ह्याने देशाला अनेक नामवंत क्रीडापटू दिले आहेत. राज्य शासनाच्यावतीने खेळांडूसाठी शासकीय नोकरीत ५ टक्के जागा राखीव ठेवण्यात येतात तसेच ऑलिंपिक विजेत्या खेळाडूला राज्य शासन अनुक्रमे सुवर्ण - ५ कोटी, रौप्य - ३ कोटी तर कांस्य पदकासाठी २ कोटी रुपये बक्षीस म्हणून देते. विद्यार्थी - युवकांना प्रोत्साहन देण्यासाठी शालेय - जिल्हा प्रशिक्षण, खेलो इंडिया, तसेच मिशन लक्षवेध आदी योजना क्रीडा विभागाकडून राबविल्या जातात. कोणत्याही खेळात निपुण होण्यासाठी सातत्य महत्त्वाचे असते. खेळाडूंनी हे सातत्य बाळगावे तसेच दैनंदिन सरावाला प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर व जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमात नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नांचे निरसन यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमासाठी माजी जिल्हा परिषद सदस्य बबलू मकानदार, मंडळाचे अध्यक्ष विशाल जाधव, उपाध्यक्ष पप्पू जमादार, बापू पवार, दामू दाते, पियुष देसले यांच्यासह इतर क्रीडाप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भरती परीक्षा सुधारणांवर उच्चस्तरीय समितीशी संवाद

## विद्यार्थी, उमेदवारांसह संबंधित घटकांना सहभागी होण्याचे आवाहन

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

**राज्यातील भरती परीक्षा पद्धतीत आवश्यक सुधारणा करण्यासाठी गठित राज्य भरती परीक्षा सुधारणा उच्चस्तरीय समितीचा छत्रपती संभाजीनगर विभागाचा दौरा सोमवार, दि. २१ सप्टेंबर रोजी होणार आहे.**

यावेळी सकाळी १०.३० ते दुपारी १ वाजेपर्यंत विद्यार्थी, उमेदवार, शैक्षणिक संस्था, कोचिंग सेंटर तसेच अन्य संबंधित घटकांशी समिती संवाद साधणार आहे. त्यानंतर दुपारी १ ते १.३० या वेळेत पत्रकार परिषद होईल. दुपारी २.३० नंतर जिल्हास्तरीय उमेदवार व इतर भागधारकांशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधण्यात येणार आहे. भरती परीक्षा पद्धतीबाबत आपले अनुभव, अडचणी व सूचना मांडू इच्छिणाऱ्या विद्यार्थी, उमेदवार आणि संबंधित घटकांनी या संवादात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अर्धन्यायिक प्रकरणांच्या जलद निपटाऱ्यासाठी मिरज तालुक्यात महसूल लोक अदालत

**सांगली । प्रतिनिधी**

तहसिल कार्यालय मिरज व क्षेत्रीय स्तरावरील मंडळ अधिकारी कार्यालय येथे अर्धन्यायिक प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान आयोजित करण्यात आले आहे. उपविभागीय अधिकारी मिरज यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार दि. २४ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तहसिल कायर्यालय मिरज येथील सभागृहात तसेच क्षेत्रीय स्तरावर तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी यांच्या कार्यालयात सोमवार दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता महसूल लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकअदालतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मिरज तहसिलदार डॉ. अपर्णा मोरे- धुमाळ यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत न्याय आणि हक्क पोहोचवणे हे क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या विचारांचे मूळ सूत्र होते. शेतकऱ्यासाठी त्यांनी केलेले काम अमिट आहे. त्यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून, राज्यात महसूल विभागांतर्गत प्रलंबित असलेली अर्धन्यायिक प्रकरणे जलद गतीने व तडजोडीने निपटारा करण्यासाठी महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान आयोजित करण्याबाबत महसूल व वन विभागाकडील शासन निर्णयान्वये निर्देश देण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने तहसीलदार मिरज आणि मिरज तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी यांचे न्यायालयामध्ये प्रलंबित असलेल्या अर्धन्यायिक प्रकरणांचा समावेश करण्यात येणार आहे. महसूल न्यायालयात प्रलंबित असलेल्या अर्धन्यायिक प्रकरणांमधील पक्षकारांनी आणि त्यांच्या विधिज्ञ यांनी तालुक्यामध्ये आयोजित लोकअदालतीमध्ये सहभाग नोंदवून दाखल अर्धन्यायिक प्रकरणात तडजोडीने आपसातील वाद मिटवून जास्तीत जास्त प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले.

# लोकसंवाद-२०२६ मधून कुपवाडमध्ये शासकीय योजनांची जनजागृती

## विविध शासकीय योजनांची माहिती देत नागरिकांना लाभ घेण्याचे आवाहन

**सांगली । प्रतिनिधी**

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने राज्यभरात १६ ते २४ सप्टेंबर २०२६ दरम्यान राबविण्यात येत असलेल्या 'लोकसंवाद-२०२६' या विशेष जनजागृती उपक्रमांतर्गत सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड येथील रूद्र युथ फाऊंडेशन गणेश मंडळात विविध शासकीय योजना व उपक्रमांची माहिती नागरिकांना देण्यात आली. शासकीय योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा तसेच योजनांची माहिती आपल्या परिसरातील नागरिक, नातेवाईक आणि मित्रपरिवारापर्यंत पोहोचवावी, असे आवाहन यावेळी करण्यात आले.**



जिल्हा माहिती कार्यालय, सांगलीच्या वतीने तसेच रूद्र युथ फाऊंडेशन गणेश मंडळाचे अध्यक्ष रिहाल दानवाडे यांच्या सहकार्याने या लोकसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास माजी उपमहापौर मोहन जाधव, समाज कल्याण विभागाचे संग्रामसिंह छत्रे, आरोग्य विभागाच्या सुरेखा मेश्रामकर, प्रियांका खराडे, जिल्हा चाईल्ड लाईनचे शानूर दानवडे आदी उपस्थित होते. यावेळी समाज कल्याण विभागाचे संग्रामसिंह छत्रे यांनी स्वाधार योजना, स्वयंम योजना, कौशल्य विकास प्रशिक्षण, जात प्रमाणपत्र पडताळणी, घरकुल योजना, रमाई आवास घरकुल योजना आदी योजनांची सविस्तर माहिती दिली. पात्र लाभार्थ्यांनी संबंधित योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे व प्रक्रियेची माहिती करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. महानगरपालिका आरोग्य विभागाच्या सुरेखा मेश्रामकर व प्रियांका खराडे यांनी नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित आभा कार्ड, आयुष्मान भारत कार्ड, जननी सुरक्षा योजना तसेच लसीकरण मोहिमेची माहिती देऊन नागरिकांना मार्गदर्शन केले. जिल्हा चाईल्ड लाईनचे शानूर दानवडे यांनी महिला व बालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या 'लेक लाडकी', 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण', 'बालसंगोपन योजना' तसेच अनाथ प्रमाणपत्र याबाबत माहिती दिली. महिला व बालकांना आपत्कालीन मदत मिळवून देण्यासाठी चाईल्ड लाईन १०९८ आणि महिला हेल्पलाईन १८१ या क्रमांकांचा वापर करण्याचे आवाहनही त्यांनी केले. शासकीय योजनांची माहिती थेट नागरिकांपर्यंत पोहोचविणाऱ्या या माहितीपूर्ण व प्रबोधनात्मक कार्यक्रमास रूद्र युथ फाऊंडेशन गणेश मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच परिसरातील गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गणेशभक्तांच्या दारी योजनांचा जागर; 'लोकसंवाद' चित्ररथ थेट मंडळांच्या परिसरात

**धुळे । प्रतिनिधी**

एका बाजूला गणरायाचा जयघोष... रोषणाईने उजळलेले मंडप... दर्शनासाठी जमलेले आबालवृद्ध गणेशभक्त... आणि दुसऱ्या बाजूला त्यांच्या दारी येऊन थांबलेला शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा माहिती व जनसंपर्क विभागाचा 'लोकसंवाद' चित्ररथ..! गणेशोत्सवाच्या उत्सवी वातावरणाला आता शासनाच्या योजनांच्या माहितीची अभिनव जोड मिळाली आहे. 'लोकसंवादाची वारी... गणेशभक्तांच्या दारी' या संकल्पनेतून धुळे जिल्ह्यात शासकीय योजनांचा जागर थेट गणेश मंडळांच्या परिसरात सुरू झाला आहे.



माहिती व जनसंपर्क विभागाच्या 'गणेशोत्सवातून लोकसंवाद-२०२६' या विशेष जनजागृती अभियानांतर्गत जिल्हा माहिती कार्यालय, धुळे यांनी तयार केलेला नाविन्यपूर्ण चित्ररथ सध्या शहरातील विविध गणेश मंडळांच्या परिसरात फिरत आहे. चित्ररथावरील माहितीफलक आणि दृकश्राव्य माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम आणि लोककल्याणकारी निर्णयांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहे. गणेश दर्शनासोबत योजनांचेही 'दर्शन' गणेशोत्सव म्हणजे उत्साह, श्रद्धा आणि लोकसहभागाचा संगम. याच लोकसहभागाला जनजागृतीची जोड देत गणेश दर्शनासाठी आलेल्या नागरिकांना आता त्यांच्या दैनंदिन जीवनात उपयोगी ठरणाऱ्या शासकीय योजनांचेही 'दर्शन' घडत आहे. भक्तीच्या उत्सवातून लोककल्याणाचा संदेश गणेशोत्सवातील गर्दी, सार्वजनिक मंडळांचे समाजाशी असलेले नाते आणि दृकश्राव्य माध्यमांचा प्रभाव यांचा कल्पक मेळ जिल्हा माहिती अधिकारी रणजितसिंह राजपूत संकल्पनेतून या अभियानात साधण्यात आला आहे. त्यामुळे योजनांची माहिती केवळ जाहिरातीच्या चौकटीत न राहता ती प्रत्यक्ष उत्सवाचा आणि लोकसंवादाचा भाग बनली आहे. गणरायाच्या चरणी भक्तीची फुले वाहताना नागरिकांच्या हाती शासनाच्या योजनांची उपयुक्त माहितीही पडत आहे. एका बाजूला भक्तीचा जागर, तर दुसऱ्या बाजूला लोककल्याणकारी योजनांचा जागर अशा दुहेरी अर्थाने धुळे जिल्ह्यात 'लोकसंवादाची वारी' आता गणेशभक्तांच्या दारी पोहोचली आहे. लोकसंवाद, लोकसहभाग, लोककल्याण या त्रिसूत्रीतून गणेशोत्सवाला जनहिताचा नवा आयाम देणारा हा उपक्रम नागरिक आणि शासन यांच्यातील संवादाचा सेतू ठरत आहे. त्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयातील बंडू चौरे, ऋषिकेश येवले, समाधान शिंदे, कैलास शिंदे हे अहोरात्र या उपक्रमात आपले योगदान देत आहेत.

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड, बीड जि. बीड- ४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं. १०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. (सर्व वाद बीड न्यायक्षेत्रे).

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT H.No.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122 (MAHARASHTRA) (JURIDICTION AT BEED)